स्थायी समिति
दाखल विषय – दि. ४/६/२०१९

**विषय क्रमांक :– १२५ त्वर्य**
मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.३/६/२०१९ चे पत्र

पुणे शहरामध्ये शहरातील रहिवासी संख्या (लोकसंख्या) साधारण चाळीस लाखांवर पोहोचली आहे. वाहनांची संख्या सुद्धा जवळपास पस्तीस लाखांच्या आसपास आहे. शहरामध्ये सार्वजनिक वाहतूक सक्षम नसल्यामुळे नाईलाजस्तव नागरिकांना स्वत:च्या खाजगी वाहनांचा वापर करावा लागतो. यामुळे लाखो वाहने रोज (तीस–पस्तीस लाख) रस्त्यांवर येत असतात. यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते, यामुळे राष्ट्रीय संपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, तसेच हवेतील प्रदूषणाचा इंडेक्स ८० च्या वर गेला आहे. ज्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होऊन नागरिकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. तरी पुणे मनपाने शहरामध्ये शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला व सर्व ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी सार्वजनिक बस सेवा (सार्वजनिक वाहतूक) संपूर्णपणे मोफत करावी, यामुळे शहरातील रस्त्यांवर येणा–या वाहनांची संख्या कमी होऊन, वाहतूक कोंडी कमी होईल तसेच यामुळे राष्ट्रीय संपत्तीचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होईल व नागरिकांच्या आरोग्यावर होणारा वाईट परिणाम कमी होईल व पर्यावरणाशी निगडीत होणारे दुष्परिणाम कमी होण्यास मदत होईल.

**विषय क्रमांक :– १२६ त्वर्य**
मा.प्रिया गदादे व मा.दिलिप बराटे यांचे दि.४/६/२०१९ चे पत्र

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिला साक्षरता सादरीकरणाचा तदानुषगांने महिला सक्षमीकरणाचा पाया देशभरात पहिल्यांदा पुणेशहरात पाया रचला. कै. अशोक कळमकर यांचापासून आजतागयात अनेक अधिकाऱ्यांनी नागरवस्ती विभागातून महिला सक्षमीकराच्या अनेक उल्लेखनीय योजना राबविल्या. पुणे मनपाने राबविलेल्या योजनाचे अनुकरण केवळ राज्यातील नव्हे तर देशातील अनेक महिलांना केले. पुणे मनपाने बचतगटांच्या माध्यामातून महिलांना मोफत प्रशिक्षण कौशल्य विकास जागा बाजारपेठासाठी सुविधा, स्वंयरोजगार योजनाच्या मार्फत आर्थिक सहाय्य आणि विविध प्रकार आणि खऱ्या अर्थाने महिलांना आधार सक्षम करण्यासाठी प्रयत्न भरघोस प्रोत्साहन दिले आहे.

याच भावनेतून २००६ सालापासून आजपर्यंत तब्बल १२ वर्ष शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेअर्तगंत शालेय पोषण पुरवण्याचे काम महिला बचत गटांकडून करुन घेतले जात आहे. महिला बचत गटांनी योग्य प्रकारे समाधानकारक रित्या हे काम केलेले आहे.

अनाकलनियरित्या कोणतेही ठोस कारण न देता ‘अक्षयपात्र’ नामक बचत गटाच्या आड बचत गटांच्या मुखवटा धारण करुन प्रत्यक्षात तथाकथित स्वयंसेवी नसलेल्या व्यापारी संस्थेला हे काम देण्याचा निर्णय मनपाच्या मुख्य सभेने घेतला होता यांस सर्वसामान्य महिला बचतगटांचा तीव्र विरोध असताना त्यापुढे जाऊन महिला बचत गटांएवेजी सेंदुल पध्दतीने शालेय पोषण पुरवण्याचा निर्णय पुणे महानगरपालिकेने घेतला आहे.

सदर कामाची टेंडर नोटीस ३ मे २०१९ रोजी जाहीर केली आहे.शेकडो महिलांच्या ज्यांच्यात निराधार, परित्यकत्या, विधवा, एकल, दलित, अल्पसंख्यांक स्त्रियांचे प्रमाण मोठे आहे. उपजिवीकेवर टाच आणणाऱ्या या निर्णयाचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करतो. तो त्वरित मागे घेऊ न ही टेंडर नोटीस रद्द करावी. अन्यथा समस्त बचत गटांवतीने लोकशाही पध्दतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल व न्याय मार्गाने लढा दिला जाईल.

वरील अन्यायकारक निर्णय त्वरित रद्दपात्र करुन पुणे शहरातील महिला सक्षमीकरणांसाठी सकारात्मक निर्णय घ्यावा.

**विषय क्रमांक :– १२७ त्वर्य**
मा.बंडू उर्फ प्रकाश ढोरे व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.४/६/२०१९ चे पत्र

मे.दुर्वा एंटरप्रायझेस डावी भुसारी कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे यांना विविध कामांचा अनुभव असल्यामुळे त्यांची पुणे मनपाच्या कन्सल्टंट पॅनेलवर नेमणुक करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १२८ त्वर्य**

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त शनिवार, दिनांक २६ जानेवारी २०१९ रोजी, सकाळी १०.३० ( साडे दहा) वाजता महापौर कार्यालय, पुणे महानगरपालिका येथे अल्पोपहार व चहापान मागविण्यात आलेला असून मा. महापौर यांनी अल्पोपहार व चहापान व्यवस्था करण्याचे तोंडी आदेश दिले होते. त्यानुसार, सदर कार्यक्रमप्रसंगी अल्पोपहार व चहापानाची व्यवस्था मे. एम. डी. भागवत, टिळक स्मारक मंदिर कॅन्टीन, पुणे ४११०३० यांचेकडून केली होती. त्याप्रित्यर्थ मे. एम. डी. भागवत, टिळक स्मारक मंदिर कॅन्टीन, पुणे ४११०३० यांनी रक्कम रूपये ३,७००/– (तीन हजार

सातशे रुपये फक्त) चे बिल सादर केलेले असून मे. एम. डी. भागवत, टिळक स्मारक मंदिर कॅन्टीन, पुणे ४११०३० यांनी ५० व्यक्तींसाठी दिलेल्या अल्पोपहार व चहापानाचे ७४/- रूपये प्रती व्यक्ती याप्रमाणे एकूण रक्कम रूपये ३,७००/- (तीन हजार सातशे रुपये फक्त)चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस व बिलाची रक्कम संबंधितास अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ७४२ दि.४/६/२०१९ चे पत्र

सन २०१९ - २०२० चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे

क. महानगरपालिका व स्थायी समिती

१. नगरसचिव यांचे कार्यालय

१५. मा. महापौर यांचा ऐच्छिक खर्च

बजेट कोड RE11A115

सन २०१९ - २०२० मान्य तरतूद रक्कम रूपये १,६०,०००/-

**विषय क्रमांक :- १२९ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेस प्राप्त झालेला स्मार्ट सिटी डिजीटल पेमेंट ॲवॉर्ड-२०१८ प्रदान समारंभप्रसंगी दिल्ली येथे जाणे-येणेकरिता मंगळवार दि. २६ फेब्रुवारी २०१९ रोजी मा. महापौर यांचे आज्ञेवरुन मे. हसमुख ट्रॅव्हल्स एजंट प्रा. लि. पुणे यांचे मार्फत पुणे ते दिल्ली व दिल्ली ते पुणे अशी विमान प्रवासाची तिकिटे आरक्षित करणेत आलेली असून त्याप्रित्यर्थ मे. हसमुख ट्रव्हल्स एजंट प्रा. लि., पुणे यांनी खालीलप्रमाणे बिल सादर केले आहे. सदरचे बिल प्रवास खर्च खात्यातून संबंधितांस अदा करणेची व्यवस्था करणेत यावी, असे मा. महापौर यांनी तोंडी आदेशानुसार कळविले होते. सदरचे बिल खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | बिल क्र. | दिनांक | प्रवास | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १) | १०२३४४० | २५/०२/२०१९ | पुणे- दिल्ली | ११,७५९ + २०० (Additional Service Charges)<br>+ ३६ [ ( GST (9 % CGST + 9 % GST)] = ११,९९५/- |
| २) | १०२३४४४ | २६/०२/२०१९ | दिल्ली -पुणे | १९,६३८ + २०० (Additional Service Charges)<br>+ ३६ [ ( GST (9 % CGST + 9 % GST)] = १९,८७४/- |
| ३) | १०२३४४१ | २६/०२/२०१९ | दिल्ली -पुणे | १३,२५०-३००० (Cancellation Charges) +<br>२०० (Additional Service Charges) +<br>३६ [ ( GST (9 % CGST + 9 % GST)] = १०,४८६/- |
| | एकूण रक्कम रूपये -<br>( ११,९९५+१९,८७४+ १०,४८६ ) | | | = ४२,३५५/- |

अनु. क्र. ३ मध्ये दर्शविलेले दिल्ली- पुणे विमान प्रवासाचे तिकिट कार्यक्रमाचे मुख्य आतिथी कार्यक्रमस्थळी उशिरा आल्याने कार्यक्रम सोहळा वेळेत पूर्ण झाला नाही. त्यामुळे अनु. क्र. ३ चे उपरोक्त विमानप्रवासाचे तिकिट रद्द करण्यात आले. सदरचे बिल परतावा रिफंड - रक्कम रुपये ३०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार) वजा जाता रक्कम रुपये १०,४८६/-(अक्षरी रक्कम रुपये दहा हजार चारशे शहाऐंशी रुपये फक्त) इतके बिल त्यांनी सादर केलेले असून सदर विमान प्रवासाचे एकुण रक्कम रुपये ४२,३५५/- (अक्षरी रक्कम रुपये बेचाळीस हजार तीनशे पंच्चावन्न रुपये फक्त) चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून संबंधितांस बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ७४३ दि.४/६/२०१९ चे पत्र

**<u>सन २०१९ - २०२० चे अंदाजपत्रक</u>**

१. मुख्य देखरेख वसुली वगैरे,

क. महानगरपालिका व स्थायी समिती,

१. नगरसचिव यांचे कार्यालय, पान नं.३८,

४. प्रवास खर्च (न.स.) RE11A 104 मान्य तरतूद रक्कम रूपये १६,००,०००/-

( अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख फक्त )

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**